जावक क्रमांक :-- ७१४ /२०१९
येरवडा पोलीस स्टेशन पुणे
दि. ११/७/२०१९

प्रति,

मा माहिती आणि जनसंपर्क अधिकारी सो.,
तथा सहा पोलीस आयुक्त, अभियान, पोलीस आयुक्त कार्यालय पुणे शहर
यांना सविनय सादर

**प्रतिवेदक :-- राजेंद्र कदम**, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, येरवडा पोलीस स्टेशन पुणे
यांज कडुन विनंती पुर्वक की,

**विषय :--** वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेबाबत..

महोदय,

उपरोक्त विषयान्वये सादर की, येरवडा पोलीस स्टेशन पुणे येथे सन २०१० पासुन, पोलीस स्टेशन हद्दित मिळुन आलेली ७ दुचाकी बिनधनी वाहने जमा आहेत. सदर वाहनांचे मालक /वारसदार यांचा आज पर्यंत शोध घेवुन हि कोणी मिळुन आले नाहीत तसेच सन १९८० पासुन आज पर्यंत विविध गुन्हयामध्ये जप्त केलेली वाहनांपैकी एकुण ६५ वाहने यांची पडताळणी करुन त्याचे विश्लेषण केले असुन सदर वाहनांचे मुळ मालक , वारसदार हे मिळुन येत नाही व फिर्यादी हे वाहन घेवुन जाणेसाठी येत नाहीत. तसेच काही वाहनांचे आर.टी.ओ. नंबर, चॅसिज् नंबर/ इंजिन नंबर, बनावट असल्याने त्यांचे मुळ मालकांबाबत माहिती मिळू शकलेली नाही. तसेच काही वाहने, पुणे प्रादेशिक परिवीन अधिकारी यांनी स्क्रॅप केलेली असताना ती वाहने चालवित असताना मिळुन आले आहेत सदरची वाहने हि आरटिओ चे नियमाप्रमाणे स्क्रॅप केली आहेत अशा प्रकारे जप्त केलेली वाहने ब-याच वर्षापासुन पडुन आहेत. त्यामध्ये दुचाकी वाहने, रिक्षा अशी ६५ वाहने आहेत.

वरील प्रमाणे एकुण ७२ वाहनांची सर्व कायदेशिर बाबींची पुर्तता करणेत आली असुन मा. न्यायालयाचे पुर्व परवानगीने सदर वाहने स्क्रॅप करुन, त्यांचा भंगारमध्ये दिनांक २५/७/२०१९ रोजी सकाळी ११-०० वा येरवडा पोलीस स्टेशन पुणे येथे जाहिर लिलाव करणेत येणार आहे.

तरी सदर बाबत वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**मा सादर व्हावे**
**दिनांक १०/७/२०१९**

( राजेंद्र कदम)
**वरिष्ठ पोलीस निरीक्षक**
**येरवडा पोलीस स्टेशन पुणे**

सहायक पोलीस आयुक्त
येरवडा विभाग, पुणे शहर
10 JUL 2019
आवक नं.